## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# शिवराज्याभिषेक दिन - अहवाल

०६/०६/२०२२

आज आमच्या महाविद्यालयामध्ये शिवराज्याभिषेक दिन सोहळा संपन्न झाला . या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी व छात्र शिक्षक उपस्थित होते . प्राचार्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी राजांच्या प्रतिमेच्या पूजनेनंतर छात्र शिक्षक श्री. अब्दुल रहेमान अत्तार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व समावेशक कार्याचा वृत्तांत सांगितला.

यानंतर छात्र शिक्षकांनी तयार केलेली भित्तिपत्रके आणि छत्रपती शिवाजी राजेंच्या जीवनावर आधारित चित्रांचे प्रदर्शनाची पाहाणी केली. अत्यंत सुंदर चित्र संग्रह पाहायला मिळाले . यावेळी माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी सर्व छात्र शिक्षकांचे कौतुक केले. शेवटी छात्र शिक्षक श्री. जेजू डायस यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## शुभेच्छा समारंभ - अहवाल

4 जुलै 2022

सन 2020 ते 21 या छात्र शिक्षकांचा शुभेच्छा समारंभ दिनांक 4 जुलै 2022 रोजी पार पडला. या कार्यक्रमांमध्ये डॉक्टर शिवाजीराव भुकेले यांनी शिक्षक कसा असावा या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. त्याचबरोबर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर एस एन शिंदे हे होते.

छात्र शिक्षकांनी वर्षभरामध्ये मिळवलेल्या प्राविण्या संदर्भात प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. शेवट सर्व प्राध्यापकांनी व निवडक क्षेत्रात विभागांनी महाविद्यालय प्रती मनोगत व्यक्त केली प्राध्यापक अमित नवले यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya, Gadhinglaj, Dist. Kolhapur ESTD 1990

# आरोग्य तपासणी शिबिर - अहवाल

०४/१०/२०२२

आरोग्य तपासणी शिबिर. आज आमच्या महाविद्यालयामध्ये जागृती शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील छात्र शिक्षकांचे आरोग्य तपासणी करण्यात आली . या उपक्रमामध्ये आमच्याच संस्थेचे पार्वती हायस्कूल औरनाळ या शाळेचा सुद्धा सहभाग व सहकार्य घेण्यात आले. आमच्या गडहिंग्लज शहरांमध्ये असलेल्या कोल्हापूर जिल्हा उपरुग्णालयातील ख्यातनाव डॉक्टर्स व अधीक्षक आणि नर्सिंग स्टाफच्या सहकार्याने आमच्या महाविद्यालयातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांचे आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये डोळे, त्वचा , कान , नाक , बी.पी. आणि घशाचे काही तक्रारी असल्यास योग्य ती तपासणी व  निदान करण्यात आले . महाविद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या जास्त असल्यामुळे महिलांच्या आरोग्याविषयीच्या समस्यांची तपासणी व निदान करण्यात आले. विशेष म्हणजे यासाठी जिल्हा उप रुग्णालयातील महिला डॉक्टर्स उपलब्ध होत्या.

साधारणपणे चार तासाचा हा तपासणीचा शिबिर चालू होता . यानंतर आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी जिल्हा उप रुग्णालयातील डॉक्टर, अधीक्षक आणि नर्सिंग स्टाफ यांचे आभार व्यक्त केले . तसेच पार्वती हायस्कूल औरनाळ चे मुख्याध्यापक , सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सुद्धा आभार व्यक्त केले . अशा प्रकारे आरोग्य तपासणीचे शिबिर संपन्न झाले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj






Shikshanshastra Mahavidyalaya, Gadhinglaj
ESTD 19

Dist. Kolhapur
ESTD 1990







## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती - अहवाल

१५/१०/२०२२

आज आमच्या महाविद्यालयांमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती साजरी करण्यात आली . कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते फोटो पूजन करण्यात आले . या फोटो पूजनाच्या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक सहभागी झाले होते. यानंतर आदरणीय प्राचार्यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर मनोवतामध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या पुस्तकामध्ये व्यक्त केलेल्या भावना स्पष्ट करून सांगितले.

आज आपल्यासमोर असणारी आव्हाने आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सांगितलेले आणि दाखवलेले मार्ग किती योग्य आहेत हे सांगितले . शेवटी छात्र शिक्षक श्री. सतीश कांबळे यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya
Gadhinglaj

Dist.Kolhapur
ESTD 1990

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## संविधान दिन - अहवाल

२६/११/२०२२

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान दिनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली .आज आमच्या महाविद्यालयामध्ये संविधान दिनाच्या निमित्ताने संविधान वाचनाचे आयोजन केले होते . या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांनी संविधान सारणीचे वाचन केले.

त्यानंतर संविधानामध्ये विशेष करून शिक्षणाच्या संदर्भात असणारे कलम, कायदे , हक्क व नियमांची चर्चा केली . या चर्चेमध्ये महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक सुद्धा सहभागी झाले होते . एकूणच आजच्या या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य , सर्व प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी आणि छात्र शिक्षक सहभागी झाले होते. शेवटी छात्र शिक्षिका कु. दर्शनी बेलेकर यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# सावित्रीबाई फुले जयंती - अहवाल

०३/०१/२०२३

सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने आमच्या महाविद्यालयामध्ये आज कार्यक्रम घेण्यात आले .कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे आणि प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. फोटो पूजनानंतर प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

महाविद्यालयातील छात्र शिक्षिका कुमारी अर्चना चौगुले , कुमारी धनश्री देसाई , कुमारी अनुपमा देशमुख , कुमारी दिपाली जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी कुमारी अश्विनी नाईक यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रम संपन्न झाला.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

---

## जागतिक पत्रकार दिन - अहवाल

०७/०१/२०२३

जागतिक पत्रकार दिनानिमित्त आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे , महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दैनिक सकाळ , दैनिक पुढारी , दैनिक लोकमत , दैनिक तरुण भारत , दैनिक महासत्ता , दैनिक पुण्यनगरी यांच्या गडहिंग्लज येथील कार्यालयामध्ये जाऊन , संबंधित दैनिकाचे पत्रकार , त्यांची सहाय्यक पत्रकार आणि कार्यालयीन कर्मचारी या सर्वांना पुष्पगुच्छ देऊन , पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या वैयक्तिक शुभेच्छा स्वीकारत असताना पत्रकार मित्र भारावले होते.

त्यानंतर महाविद्यालयामध्ये येणाऱ्या वृत्तपत्र वितरक मित्रांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले व पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शेवटी एकत्रित चहापानाचा कार्यक्रम झाला.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# नवागतांचे स्वागत समारंभ - अहवाल

१०/०१/२०२३

सन 2022 ते 24 या शैक्षणिक वर्षासाठी आमच्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या छात्र शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी केले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षक श्री. दर्शन मोरे यांनी केले तसेच उपस्थित सर्वांचे स्वागत सुद्धा केले. त्यानंतर श्री.सेबेस्टीन फेराव या छात्र शिक्षकांनी महाविद्यालयांमध्ये राबवले जाणारे उपक्रम, महाविद्यालयाचा स्टाफ आणि महाविद्यालयाची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि प्रथम वर्षाच्या सर्व छात्र शिक्षकांचे शब्दसुमनाने स्वागत केले. या कार्यक्रमास आमच्या संस्थेचे कार्याध्यक्ष डॉक्टर सतीश घाळी व प्रा. सुनील देसाई उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक उपस्थित होते. शेवटी छात्र शिक्षिका कु. सुमिता पाटील यांनी सर्वांचे आभार मानले .




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya, Gadhinglaj
Dist.Kolhapur
ESTD 1990







PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya,
Gadhinglaj.

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# मराठी राजभाषा दिन - अहवाल

दि. २७/०२/२०२३

**मराठी राजभाषा दिन** अर्थात मराठीचे श्रेष्ठ तथा ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज म्हणजेच वी.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन होय. आपल्या महाराष्ट्रामध्ये हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आमच्या महाविद्यालयात आज कार्यक्रम आयोजित केला होता.

सुरुवातीला भित्तीपत्रकाचे उद्घाटन माननीय प्राचार्य प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील मराठी विषयाचे विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. ए. एम. नवले आणि मराठी विभागाचे छात्र शिक्षक उपस्थित होते.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya, Dist. Kolhapur, ESTD 1990, Gadhinglaj

# स्वातंत्र्य दिन - अहवाल

१५/०८/२०२३

विद्या प्रसारक मंडळ संचलित जागृती बीएड कॉलेज न्यू होरायझन सीबीएससी स्कूल आणि पार्वती हायस्कूल यांचे संयुक्त स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित ध्वजारोहणासाठी आमच्या संस्थेचे मा. सचिव श्री. ॲड. बी. जी. भोसकी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर नंतर राष्ट्रगीत, झेंडागीत आणि भक्तीपर गीतांचे सादरीकरण झाले. स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमासाठी उपस्थित तिन्ही शाखेचे शाखाप्रमुख , प्राध्यापक , शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि तिन्ही विभागाचे सर्व विद्यार्थी तसेच जवळपासच्या गावचे सन्माननीय नागरी बहुसंख्येने उपस्थित होते .

या सर्वांचे स्वागत महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. ए एम नवले यांनी केले. तिन्ही शाखेतील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. शेवटी प्राध्यापक एस. एस. जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya,
Gadhinglaj.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# शिक्षक दिन - अहवाल

०५/०९/२०२३

आज आमच्या महाविद्यालयांमध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते फोटो पूजनाचा कार्यक्रम झाला. या निमित्य आयोजित केलेल्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी उचललेली होती.

महाविद्यालयातील उपस्थित सर्व छात्र शिक्षकांच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. शेवटी द्वितीय वर्षाची छात्र शिक्षिका कु. उमा गाढवी यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# भित्तीपत्रकांचे प्रदर्शन - अहवाल

०५/०९/२०२३

आज आमच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक साधन निर्मिती प्रात्यक्षिक कार्याच्या माध्यमातून तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. मुख्याध्यापक श्री. श्रीरंग तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षिका कु. धनश्री शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राजर्षी शाहू महाराज जयंती - अहवाल

आमच्या महाविद्यालया मध्ये दि. २६ /०६ /२०२१ रोजी राजर्षी शाहू महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एन.शिंदे यांच्या हस्ते फोटो पूजनाचा कार्यक्रम झाला.

नंतर झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षक श्री. अशोक सुतार यांनी केले. हा कार्यक्रम आयोजित करण्या पाठीमागे मागे महाविद्यालयाचा हेतू स्पष्ट केला. या प्रास्ताविके नंतर छात्रशिक्षक श्री. दर्शन मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

छात्र शिक्षकांच्या मनोगता नंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतामध्ये प्राचार्यांनी स्पष्ट केले की , समाजातील सामान्य माणूस केंद्रबिंदू म्हणून आदरणीय शाहू महाराज यांनी आपली कार्यनीती तयार केली होती . सर्व सामान्य समाजा साठी आपण काय करू शकतो हे त्यांच्या केलेल्या कामातून स्पष्ट होते. शेतकरी, कष्टकरी, मजूर, दिन-दलित, गरीब, हुशार, गरजवंत अशा लोकांना केंद्रबिंदू मानून महाराजांनी कार्य करत राहिले. समाजातील प्रत्येक जाती वर्गासाठी वेगळी भूमिका घेतली होती. प्रत्येकाची स्वतंत्र व्यवस्था केली होती. अध्यक्षीय मनोगता नंतर छात्र शिक्षिका कुमारी आरती पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

### लो. टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती - अहवाल

आज दि. ०१/०८/२०२१ रोजी आमच्या महाविद्यालयांमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती हा संयुक्त कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला या महान नेत्यांचे फोटो पूजन केले.

यानंतर आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षिका कु. अस्मिता भाट यांनी केले. प्रास्ताविकेनंतर छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये श्री. जगन्नाथ बर्वे, कु.ज्योती अलमान, कु. लक्ष्मी मगदूम, कु. पूजा चौगुले, श्री.प्रमोद ढेंगे आदी छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. यानंतर माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षिका कु. प्रियंका कदम यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# स्वातंत्र्य दिन - अहवाल

१५/०८/२०२१

विद्या प्रसारक मंडळ संचलित जागृती बीएड कॉलेज न्यू होरायझन सीबीएससी स्कूल आणि पार्वती हायस्कूल यांचे संयुक्त स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित ध्वजारोहणासाठी आमच्या संस्थेचे मा. सचिव श्री. ॲड. बी. जी. भोसकी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर नंतर राष्ट्रगीत, झेंडागीत आणि भक्तीपर गीतांचे सादरीकरण झाले. स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमासाठी उपस्थित तिन्ही शाखेचे शाखाप्रमुख , प्राध्यापक , शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि तिन्ही विभागाचे सर्व विद्यार्थी तसेच जवळपासच्या गावचे सन्माननीय नागरी बहुसंख्येने उपस्थित होते .

या सर्वांचे स्वागत महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी केले. तिन्ही शाखेतील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. शेवटी प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya, Dist. Kolhapur, ESTD 1990, Gadhinglaj

## हिंदी दिन समारोह - अहवाल

४/०९/२०२१

हिंदी दिनाच्या निमित्ताने आज आमच्या महाविद्यालयामध्ये कार्यक्रम आयोजित केला होता . या कार्यक्रमाच्या सुरूवातीला छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकांचे उद्घाटन फीत कापून केली . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला .

हिंदी विभागाच्या छात्र शिक्षकांच्या बरोबरीने इतर छात्र शिक्षकांनी सुद्धा अत्यंत आकर्षक आणि सुंदर असे भित्तीपत्रके तयार केले होते. यानंतर महाविद्यालयातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या शिक्षकांनी एकत्रित असे दोन गट केले, यामध्ये प्रथम आणि द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक आणि मुले व मुली असे एकत्र करून त्यांचे दोन गट तयार केले होते. या दोन्ही गटांमध्ये हिंदी गाण्यांची अंताक्षरीची स्पर्धा घेण्यात आली . ही स्पर्धा अत्यंत रोमांचक अशी झाली.

अनेक छात्र शिक्षण खूपच सुंदर असे हिंदी फिल्मी गीते आणि काही जुन्या कवितांचे सादरीकरण केले. यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी सुद्धा सहभागी झाले होते. जवळपास दोन तासाच्या या कार्यक्रमानंतर शेवटी महाविद्यालयातील हिंदीचे प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी सर्व छात्र शिक्षकांचे कौतुक केले आणि उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj







PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# शिक्षक दिन - अहवाल

०५/०९/२०२१

आज आमच्या महाविद्यालयांमध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते फोटो पूजनाचा कार्यक्रम झाला. या निमित्य आयोजित केलेल्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी उचललेली होती.

आजच्या दिवसाचे वेळापत्रकाप्रमाणे होणाऱ्या कामकाजाची जबाबदारी द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी पार पाडले. सुरुवातीचे वेळापत्रकातील अध्यापनाचे पाच तास द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी घेतले. यानंतर प्रथम वर्षाच्या छात्र शिक्षकांना अल्पोपहार देण्यात आले महाविद्यालयाकडून द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांसाठी व्यवस्था केली होती.

महाविद्यालयातील उपस्थित सर्व छात्र शिक्षकांच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. शेवटी द्वितीय वर्षाची छात्र शिक्षिका कु. उमा गाढवी यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# महात्मा गांधी जयंती आणि लाल बहादूर शास्त्री जयंती - अहवाल

०२/१०/२०२१

महात्मा गांधी जयंती आणि लाल बहादूर शास्त्री जयंती असा संयुक्त कार्यक्रम आज आमच्या महाविद्यालयामध्ये संपन्न झाला . या कार्यक्रमाच्या निमित्ताने छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर या दोन महान नेत्यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक श्री. एस. एन. तांबे यांच्या हस्ते करण्यात आले . प्रतिमा पूजनानंतर आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षक श्री. महेश नरेवाडी यांनी केले. प्रास्ताविकेनंतर महाविद्यालयातील छात्र शिक्षक श्री. प्रवीण सावंत , कु. रेश्मा देसाई , कु. संपदा मरणहोळकर , कु. शिल्पा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक श्री. श्रीरंग तांबे यांनी आपले विचार व्यक्त केले . त्यानंतर या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले . शेवटी छात्र शिक्षक श्री. श्रावण सूर्यवंशी यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# सावित्रीबाई फुले जयंती - अहवाल

०३/०१/२०२२

आज आमच्या महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता . सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर छात्र शिक्षिका कुमारी रूपा नेवडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले

प्रास्ताविकानंतर छात्र शिक्षकांचे मनोगत झाले.यामध्ये कुमारी श्वेता पाटील , कुमारी सुषमा कणसे , कुमारी स्वप्नाली कुंभार , कुमारी स्वाती यादव आणि श्री. सचिन कुंभार यांनी आपले विचार व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थीनींच्यासाठी संगीत खुर्चीच्या स्पर्धेचे आयोजन केले होते . या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील सर्व छात्र शिक्षिका आणि प्राध्यापिकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये खूपच मजा आली .या स्पर्धेच्या विजेत्या कुमारी प्रणाली देसाई यांचा सत्कार प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. शेवटी छात्र शिक्षिका कुमारी विद्या देसाई यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती - अहवाल

१२/०१/२०२२

आमच्या महाविद्यालयांमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता . यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते या नेत्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .

प्रतिमा पूजनानंतर प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे उद्घाटन ज्येष्ठ प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले . यानंतर महाविद्यालयाच्या वेळापत्रकातील पहिल्या दोन तासांमध्ये सर्व छात्र शिक्षकांना ग्रंथालयाच्या भेटीसाठी पाठवून दिले.आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये असणाऱ्या सर्व ग्रंथांची व मराठी साहित्याची तोंड ओळख करून घेण्याची सूचना देण्यात आली होती. प्रत्येक छात्र शिक्षकांनी पाहिलेल्या पुस्तकांची आणि लेखकांची नावे लिहिण्यासाठी सांगितले.

यामध्ये 25 पेक्षा जास्त पुस्तक आणि लेखकांची नावे लिहिलेल्या चार छात्र शिक्षकांचे सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले . यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्यांनी स्वामी विवेकानंदांची वाचन संस्कृती जपणे हा हेतू होता असे स्पष्ट केले . शेवटी प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## प्रजासत्ताक दिन - अहवाल

२६/०१/२०२२

प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला . विद्या प्रसारक मंडळ , गडहिंग्लज संचलित जागृती शिक्षण शास्त्र महाविद्यालय न्यू होरायझन सी.बी.एस.ई. स्कूल आणि पार्वती हायस्कूल औरनाळ यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. विद्या प्रसारक मंडळ गडहिंग्लज चे ज्येष्ठ संचालक डॉ. शिवकुमार कोल्हापुरे यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम ठीक सकाळी ७.40 मिनिटांनी संपन्न झाला.

यानंतर आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांच्या एका गटाने राष्ट्रगीत , संविधान वाचन आणि देशभक्तीपर गीत सादर केले . या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील सरपंच , ग्रामपंचायत सदस्य , विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते . आमच्या या तिन्ही शाखेचे विभाग प्रमुख , शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी उपस्थित सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने आभार व्यक्त केले आणि कार्यक्रम संपला अशी जाहीर केले.



PRINCIPAL
Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya
Gadhinglaj

## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Shikshanshastra Mahavidyalaya Dist.Kolhapur ESTD 1990 गडहिंग्लज

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती - अहवाल

१९/०२/२०२२

आज आपल्या महाविद्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केली .या निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रतिमा पूजनानंतर महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते . यावेळी प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या मनोगतामध्ये राजांच्या शौर्यांची ओळख करून दिली.

मनोगतानंतर द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी छत्रपती शिवाजी राजेंच्या राज्याभिषेक सोहळ्याचे कृतीयुक्त सादरीकरण केले. अत्यंत प्रभावी आणि देखणं असे हे सादरीकरण पाहायला मिळाले. यामध्ये श्री. अलमतीन शेख ,श्री. भूषण भोसले पाटील , श्री. दर्शन मोरे, श्री . सेबिस्टीन फेराव, कु. पुनम भोसले ,कुमारी रूपा नेवडे, कुमारी स्नेहल सावंत , कुमारी स्नेहल पाटील यांनी भाग घेतला होता. या सर्वांचे आभार कुमारी वंदना पाटील यांनी मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya Dist Kolhapur ESTD 1990 Gadhinglaj

# मराठी राजभाषा दिन- अहवाल

२७/०२/२०२२

आज आमच्या महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता . हा दिवस मराठीचे श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस आहे. कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे व श्री अरविंद देसाई यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी कवी कुसुमाग्रजांची थोडक्यात ओळख करून दिली.

यानंतर मराठी विभागातील छात्र शिक्षकांनी व्याख्यान कक्षेमध्ये एक वेगळाच कार्यक्रम आयोजित केला होता. मराठी आणि हिंदी भाषेतील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यकार आणि त्यांच्या साहित्याची सविस्तर ओळख आणि माहिती छात्र शिक्षकांनी करून दिली. उपस्थित सर्व छात्र शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला . एक वेगळा उपक्रम ऐकण्याचे आणि पाहण्याचे दुर्मिळ योग आज आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांना मिळाले.

शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. ए. एम. नवले आणि मराठी विभागाच्या सर्व छात्र शिक्षकांचे अभिनंदन केले . शेवटी छात्र शिक्षक श्री. सुदर्शन मोरे यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# जागतिक महिला दिन - अहवाल

०८/०३/२०२२

जागतिक महिला दिनानिमित्त भित्तिपत्रकाचे प्रदर्शन आमच्या महाविद्यालयामध्ये आयोजित केले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव यांनी फित कापून केले.

यानंतर आमच्या महाविद्यालयातील महिला छात्र शिक्षिका यांनी एक उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. भारतामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या पाच महिलांची सविस्तर माहिती सादर केले . यामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले , श्रीमती इंदिरा गांधी , मदर तेरेसा , सिंधुताई सपकाळ आणि कल्पना चावला यांची संपूर्ण माहिती एकेका छात्र शिक्षिकेने सादर केले. अत्यंत प्रभावी व परिपूर्ण असा कार्यक्रम झाला.

महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांनी आयोजक छात्र शिक्षकांचे पुष्प देऊन अभिनंदन केले उपस्थित सर्व महिला छात्र शिक्षिकांचे छोटेसे सत्कार आणि शुभेच्छा कार्यक्रम झाला शेवटी कु. वंदना पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती - अहवाल

१४/०४/२०२२

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये भित्ती पत्रकांच्या प्रदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले होते. या भितीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

आदरणीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील प्रत्येकाने एका पैलूची माहिती सविस्तरपणे आपल्या भित्तीपत्रकावर मांडली होती. त्यामुळे प्रत्येकामध्ये एक वेगळे वैशिष्ट्य दिसत होते. यामध्ये सर्वच छात्र शिक्षकांनी आपला खारीचा वाटा दिला होता. त्यामुळे या कार्यक्रमाच्या वेळी सर्व छात्र शिक्षकांमध्ये एक वेगळाच उत्साह दिसत होता. यावेळी उपस्थित सर्वांचे अभिनंदन आणि कौतुक आदरणीय प्राचार्यांनी केले.

शेवटी छात्र शिक्षक श्री. शंकर पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj.

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya Dist. Kolhapur ESTD 1990 Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# जागतिक पुस्तक दिन - अहवाल

२३/०४/२०२२

आज रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला . या कार्यक्रमाचे नियोजन आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. प्रशांत कोरी यांनी केले होते . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी आणि छात्र शिक्षकांनी एकत्र येऊन या कार्यक्रमांमध्ये हातभार लावला होता.

सुरुवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल यांनी जागतिक पुस्तक दिन का व कसे साजरे केले जाते , याची थोडक्यात माहिती दिली . त्यानंतर महाविद्यालयाच्या व्हरांड्यात मुबलक अशा मोकळ्या जागेवर ग्रंथालयातील वाचनीय असे ग्रंथ व महत्त्वाची पुस्तके मांडून ठेवण्यात आली होती . या सर्व पुस्तकांची प्राथमिक ओळख ग्रंथपाल श्री. प्रशांत कोरे यांनी करून दिली . प्राचार्य, प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी आणि छात्र शिक्षकांना जसे वेळ मिळेल, त्याप्रमाणे आपल्या आवडीचे पुस्तक हाताळावे आणि वाचनीय भागाचे अवलोकन करून पुस्तक समजून घ्यावे , अशी अपेक्षा ग्रंथपालांची होती.

या सर्व उपक्रमामध्ये आमच्या महाविद्यालयातील ग्रंथपालांच्या बरोबरीने शिक्षकेतर कर्मचारी व काही निवडक छात्र शिक्षकांनी योगदान दिले होते. एकंदरीत या नवीन उपक्रमामुळे आपल्या ग्रंथालयामध्ये असणारी जुनी, महत्त्वाची आणि आदर्शवत पुस्तके डोळ्यासमोर आली. त्यातली काही महत्त्वाचे मजकूर नजरेखालून घालण्याची संधी उपलब्ध करून दिली, यामुळे महाविद्यालयातील सर्वच घटकांना हे उपक्रम उपयुक्त ठरले. शेवटी महाविद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव यांनी सर्वांचे आभार मानले. विशेष करून ग्रंथपाल श्री. प्रशांत कोरे यांचे अभिनंदन सुद्धा करण्यात आले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# कृतज्ञता पर्व कार्यक्रम - अहवाल

०५/०५/२०२२

आज आमच्या महाविद्यालयामध्ये कृतज्ञता पर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . राजर्षी शाहू महाराजांचे स्मृती शताब्दी निमित्त " कृतज्ञता पर्व " या कार्यक्रमाचे आयोजन केले होते . या कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यामध्ये राजर्षी श्री. शाहू महाराजांच्या स्मृती प्रित्यर्थ व्याख्याने आयोजित केली होती . त्यातीलच एक व्याख्यान आज आमच्या महाविद्यालयामध्ये झाले. या व्याख्यानासाठी व्याख्याते म्हणून माननीय डॉ. आर. पी. हेंडगे, (प्राध्यापक शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज) हे उपस्थित होते . प्राध्यापक डॉ. हेंडगे यांनी राजर्षी शाहू महाराजांचा संपूर्ण जीवन वृत्तांत आपल्या दोन तासाच्या व्याख्यानामध्ये सांगितला . त्यांच्या जीवनातील काही उदाहरणे आणि दाखले देऊन अत्यंत रोचक असे व्याख्यान झाले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला आमच्या महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले . या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान आमच्या संस्थेच्या पार्वती हायस्कूल औरनाळचे श्री. बी.जी. कुंभार सर होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक उपस्थित होते. शेवटी प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya,
Gadhinglaj

Dist.Kolhapur
ESTD 1990








PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya Gadhinglaj Dist. Kolhapur ESTD 1990

# साक्षरता दिन - अहवाल

आज दि. ०८/०९/२०२० आमच्या महाविद्यालयामध्ये साक्षरता दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सकाळच्या सत्रामध्ये आमच्या संस्थेची शाळा पार्वती हायस्कूल औरनाळच्या सहकार्याने साक्षरता रॅलीचे आयोजन केले होते. पार्वती हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या बरोबर आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांनी तयार केलेले पोस्टर घेऊन गावातून साक्षरता अभियान व जागृती अशा प्रकारची एक रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये पार्वती हायस्कूलचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्याध्यापक सहभागी झाले होते. त्यांच्याबरोबर आमच्या महाविद्यालयातील सर्व छात्र शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

या रॅलीमध्ये आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांना एक वेगळा अनुभव अनुभवयास मिळाले. या रॅली नंतर महाविद्यालयाच्या छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ही भित्तिपत्रके तयार करण्यामध्ये सर्व छात्र शिक्षकांनी खूप मेहनत घेतली होती. या कार्यक्रमासाठी आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती एस. एस. जाधव यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सर्व छात्र शिक्षकांचे कौतुक केले. विशेषता पार्वती हायस्कूल औरनाळच्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, तसेच मुख्याध्यापकांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता छात्र शिक्षिका कु. सुप्रिया माने यांच्या आभार प्रदर्शनाने झाले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Dist. Kolhapur ESTD 1990

## हिंदी दिन - अहवाल

दि . १४ सप्टेंबर 2019 रोजी जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने वेगवेगळ्या विषयांवर भित्तीपत्रक तयार करण्यात आली होती. या भित्तीपत्रकाचे प्रदर्शन महाविद्यालयाच्या व्हरांड्यात लावण्यात आलेल्या काच फलकांमध्ये केले होते. सुरुवातीला या भित्तीपत्रकांचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस . एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले . या भित्तीपत्रकमध्ये हिंदी भाषेचे महत्व , हिंदी भाषेची वैशिष्ट्ये , राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेमध्ये असलेले गुण , भारतातील सर्वात लोकप्रिय भाषा म्हणून हिंदीला असलेली मान्यता , हिंदीचे समृद्ध असे साहित्य , हिंदी मध्ये प्रसिद्ध असलेले साहित्यकार व त्यांचा जीवन परिचय , अन्य भाषेला सांगून घेण्याची हिंदीमध्ये असलेली कुवत अशा वेगवेगळे विषय भित्तीपत्रकमध्ये दिसून आले.

हिंदी विभागाच्या छात्र शिक्षकांनी खूप मेहनत घेतली होती . या सर्व छत्र शिक्षकांचे कौतुक आणि अभिनंदन हिंदी विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी केले . शेवटी श्री. प्रवीण फाळके या छात्र शिक्षकांनी सर्वांचे आभार मानले .




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# हिंदी दिन - अहवाल

आज दि. १४/०९/२०२० हिंदी दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयांमध्ये भित्तीपत्रकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. महाविद्यालयाचे हिंदी विषयाचे प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता . हिंदी विभागाच्या छात्र शिक्षकांच्या बरोबरच महाविद्यालयातील इतर विषयाचे छात्र शिक्षक सुद्धा हिंदीमध्ये भितीपत्रके तयार करून आणले होते. अत्यंत सुंदर आणि रेखीव अशा भितीपत्रकांचे प्रदर्शन महाविद्यालयाच्या काचफलकामध्ये मांडण्यात आले होते . सुरुवातीला या भितीपत्रकाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्‌घाटनानंतर प्रास्ताविकेमध्ये प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी भारताच्या स्वातंत्र्यापासून भाषेची लढाई भारतामध्ये कशी सुरू झाली आणि भाषावार प्रांतरचनेमुळे देश चालवणे सोपे झाले, पण देशाचे प्रशासन चालवणे किती कठीण झाले. हे सविस्तर सांगितले. देशाच्या प्रशासनाची सर्वानुमते एक भाषा असणे आवश्यक होते. पण प्रत्येक राज्याला भाषिक स्वायत्तता दिल्यामुळे अखंड आणि एकत्रित प्रशासन करणे अवघड झाले. सर्व समावेशक मार्ग काढण्यासाठी बहुसांख्यिक भाषा म्हणून हिंदीला मान्यता दिल्याशिवाय पर्याय नसल्याचे आवर्जून सांगितले. यानंतर मा. प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी हिंदी विषयाची छात्र शिक्षिका कु. सुजाता स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## हृदय विकार जागृतता दिन - अहवाल

आज दि. २४/०९/२०२० आमच्या महाविद्यालयामध्ये **हृदयविकार जागृतता दिन** हा कार्यक्रम संपन्न झाला. यानिमित्य गडहिंग्लज शहरातील डॉक्टर व आरोग्य सुविधा उपलब्ध करणाऱ्या संस्थेकडून मार्गदर्शक असे पोस्टर एकत्रित केले होते. त्या सर्व पोस्टर्सचे प्रदर्शन महाविद्यालयामध्ये मांडण्यात आले होते. प्रत्येक चित्रांवरती मार्गदर्शक सूचना दिली होती . अत्यंत आकर्षक अशी मांडणी केली होती. यावेळी आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी आनंदी जीवनाची गुरुकिल्ली आहे हे सांगितले. मानवाच्या व्यस्त जीवनामुळे हृदयविकाराच्या वाढत्या प्रमाणाबद्दल चिंता व्यक्त केली. आपले हृदय निरोगी आणि सक्षम ठेवण्यासाठी आपल्या दैनंदिन कामामध्ये कोणती काळजी घेतली पाहिजे हे सांगितले.

मा. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे कामकाज चालवण्यासाठी जसे वेळापत्रक महत्त्वाचे असते तसे आपल्या आनंदी जीवनासाठी सुद्धा आपले एक स्वतःचे वेळापत्रक तयार करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कटाक्षाने आपले जीवन या वेळापत्रकाप्रमाणे व्यतित करण्याचा प्रयत्न जर केला, तर आपण आपले हृदय सक्षम आणि निरोगी ठेवू शकतो. चिंता ही चितेकडे घेऊन जाते, त्यामुळे एखाद्या गोष्टीची चिंता किती करावी हे सुद्धा ठरविणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले व्यक्त केले . शेवटी छात्र शिक्षक श्री. अरुण कुंभार यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# रक्तदान दिन - अहवाल

आज दि. ०१/१०/२०२० रक्तदान दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची सुरुवात भितीपत्रकाच्या उद्‌घाटनाने झाली. रक्तदान म्हणजे जीवनदान या आशयावर आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांनी वेगवेगळी भित्तिपत्रके तयार केली होती. या भिक्तिपत्रकाचे प्रदर्शन महाविद्यालयांमध्ये मांडण्यात आले होते. यामध्ये छात्र शिक्षकांनी उस्फुर्त सहभाग घेतला होता. भितीपत्रकाच्या उद्‌घाटनानंतर सर्व उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक श्री . अरुण पाटील या छात्र शिक्षकांनी केले. यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नुकताच आलेल्या आणि धुमाकूळ घातलेल्या covid-19 मुळे भीतीदायक वातावरण तयार झाले होते. यामध्ये औषधाबरोबरच रक्ताचा तुटवडा किती भासतो आहे हे प्रत्यक्ष आपण अनुभवलेलं आहोत. त्यामुळे भविष्यात असे प्रसंग पुन्हा उद्भवू शकतात आणि अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी निरोगी आणि स्वस्थ तरुणांनी नियमित रक्तदान करणे गरजेचे आहे असे सांगितले. उपस्थित सर्व छात्र शिक्षकांना रक्तदान करण्याचे आव्हान केले व या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षक श्री. सुशांत सावंत यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## महात्मा गांधी जयंती आणि लाल बहादूर शास्त्री जयंती- अहवाल

आज दि. ०२/१०/२०२० म. गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करून घेण्यात आले. या स्वच्छता अभियानामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वतः प्राचार्य सहभागी झाले होते. कोविड १९ ची खबरदारी म्हणून पुरेशी सॅनिटायझर आणि मास्कचा वापर करण्यात आला होता. उपस्थित सर्व छात्र शिक्षक, इतर शिक्षक, सर्व कर्मचारी मनापासून साफसफाई करीत होते.

या स्वच्छता अभियाना नंतर महात्मा गांधीजी आणि लालबहादूर शास्त्रीजी यांच्या फोटोचे पूजन माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्वच्छता अभियानाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व छात्र शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे मनापासून ऋण व्यक्त केले. महाविद्यालयाच्या या उपक्रमासाठी उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# सावित्रीबाई फुले जयंती

आज दि. ०३/०१/२०२१ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आज महाविद्यालयांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. आजच्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षिकेने घेतली होती.

प्रतिमा पूजनानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षिका कु. ललिता मोरे यांनी केले. प्रास्ताविकेनंतर छात्र शिक्षिकांची मनोगते झाली. यामध्ये कु. गीता पाटील , कु. संतोषी सावंत, कु. मयुरी शिंत्रे, कु. शितल होडगे, कु. रीमा जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सावित्रीबाईंच्या मुळे स्त्रियांना मिळालेले अधिकार, कायदेविषयक संरक्षण, तसेच समाजामध्ये आणि घरामध्ये मिळणारे आदर आपल्या मनोगता म व्यक्त केले.

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतामध्ये माननीय प्राचार्यांनी महाविद्यालयातील संपूर्ण स्त्री वर्गाला शुभेच्छा दिले आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामाबद्दल गौरव सुद्धा केले. शेवटी कु. सुजाता स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले. अशा प्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती- अहवाल

आज दि. १२/०१/२०२१ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त जयंतीचा कार्यक्रम महाविद्यालयांमध्ये संपन्न झाला . सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम झाला.

यानंतर छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांच्या हस्ते भित्तिपत्रकाचे उद्घाटन झाले. राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचा आढावा घेणारी भित्तिपत्रके छात्र शिक्षकांनी तयार केले होते. त्याचबरोबर स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार आणि आत्ताच्या काळामध्ये त्याची गरज या शीर्षकाखाली अभ्यासपूर्ण अशी भितीपत्रके तयार केले होते.

महाविद्यालयाचे मा. प्राचार्यांनी सर्व छात्र शिक्षकांचे अभिनंदन केले. उत्स्फूर्तपणे सहभाग दाखविल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने आभार व्यक्त केले. अशा प्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## प्रजासत्ताक दिन - अहवाल

आज दि २६/०१/२०२१ रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित केला होता . या कार्यक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे सहसचिव श्री. गजेंद्र बंदी साहेब उपस्थित होते. आजच्या या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कोविडच्या दुसऱ्या लाटीच्या प्रसाराच्या भीतीमुळे छात्र शिक्षक उपस्थित नव्हते . प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम झाल्यानंतर , राष्ट्रगीत आणि झेंडा गीत झाले . महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक श्री. अनिल दड्डी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले . अशा प्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्‌यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## जागतिक सूर्यनमस्कार दिन - अहवाल

आज दि. २८/०१/२०२१ आमच्या महाविद्‌यालयामध्ये जागतिक सूर्यनमस्कार दिनाचा ऑनलाइन कार्यक्रम आयोजित केला होता . या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्‌यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या प्रास्ताविकेने झाले. यानंतर आमच्या महाविद्‌यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. सुहास देसाई सरांनी सूर्यनमस्काराचे प्रकार, तसेच सूर्यनमस्कार घालण्याची प्रक्रिया आणि त्याचे फायदे सविस्तरपणे विशद केले.

हा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने जरी घेण्यात आला असला, तरी छात्र शिक्षकांचा सहभाग चांगला होता. महाविद्‌यालयातील सर्व प्राध्यापक या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्‌यालयातील प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya,
Gadhinglaj.

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती - अहवाल

आज दि. १९/०२/२०२१ छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रतिमा पूजनानंतर ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र सविस्तरित्या विद्यार्थ्यांच्या समोर मांडले . या ऑनलाइन कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील सर्व छात्र शिक्षक सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalay
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya, Gadhinglaj
Dist. Kolhapur
ESTD 1990

# मराठी राजभाषा दिन - अहवाल

आज दि. २७/०२/२०२१ आमच्या महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पालक आनंदा कोंडस्कर यांच्या हस्ते मराठीचे श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या फोटो पूजनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते फोटो पूजन झाले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

फोटो पूजनानंतर महाविद्यालयातील मराठी विषयाचे विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी मराठी भाषा, मराठी साहित्य, साहित्यकार आणि आजची परिस्थिती या विषयावर छात्र शिक्षकांच्या बरोबर चर्चा केली. या कार्यक्रमामध्ये मराठी विषयाच्या छात्र शिक्षकांच्या बरोबरीने इतर विषयाचे छात्र शिक्षक सहभागी झाले होते. शेवटी मराठी विषयाचे छात्र शिक्षिका कु. नामिता कोंडस्कर यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राष्ट्रीय विज्ञान दिन - अहवाल

आज दि. २८/०२/२०२१ आमच्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ऑनलाईन चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात आणि प्रास्ताविक आमच्या महाविद्यालयातील विज्ञान विषयाच्या प्राध्यापिका श्रीमती संगीता जाधव मॅडम यांनी केले. प्रस्तावनेमध्ये चर्चा सत्रातील विषय - "माध्यमिक स्तरावरील विज्ञान शिक्षकासमोरील आव्हाने" या विषयाची मांडणी सविस्तरपणे केली. या विषयावर प्रत्येकाने आपली मते मांडण्यासाठी सांगितले.

या चर्चेमध्ये विज्ञान विषयातील छात्र शिक्षक श्री. समीर बिरंबळे, श्री. अभिजीत देवार्डे, श्री. पराग डोंगळे, श्री. अंकुर गोरुले, कुमारी रीमा जाधव कुमारी अलका कुंभार कुमारी सुप्रिया माने, कुमारी माधुरी पाटील, कुमारी रोहिणी सावंत, कुमारी मयुरी शिंत्रे, श्री. सोहेल तुरेवाले आदी छात्रशिक्षकांनी आपले विचार व्यक्त केले. छात्र शिक्षकांचे विचार ऐकल्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी कु. सेवेस्टीना वाझ यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती- अहवाल

आज दि. १४/०४/२०२१ आमच्या महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता . कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली.

यानंतर माननीय प्राचार्य डॉ.एस.एन.शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवनातील प्रत्येक घटनेची माहिती सांगितली. यावेळी महाविद्यालयातील सर्व छात्र शिक्षक सहभागी झाले होते. काही छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. शेवटी छात्र शिक्षक श्री.अरूण पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj






PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya,
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# शिवराज्याभिषेक दिन सोहळा

०२/०६/२०१९

आज आमच्या महाविद्यालयामध्ये शिवराज्याभिषेक दिन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन आमच्या महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या छात्र शिक्षकांनी केले होते . या कार्यक्रमाला सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटो पूजनाने झाली . महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. सुधाकर शिंदे सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले . यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. मनोज भोगटे यांनी केले . प्रास्ताविकानंतर छात्र शिक्षकांची मनोगते झाली .

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजन पद्धतीने केली होती. प्रत्येक छात्र शिक्षकांनी शिवाजी राजेंच्या जीवनातील एक - एक वैशिष्ट्य विशद करून सांगितले . अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्यांनी शिवराज्याभिषेक दिन सोहळा आपल्या महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यामागचा हेतू सांगितला . सर्व इतिहास अध्यापन पद्धतीच्या छात्र शिक्षकांचे कौतुक केले . शेवटी इतिहास अध्यापन पद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक श्री. रविंद्र पाटील यांनी सर्वांचे आभार मानले . अशा प्रकारे कार्यक्रमाची सांगता झाली.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya, Gadhinglaj Dist. Kolhapur ESTD 1990

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## जागतिक सूर्यनमस्कार दिवस - अहवाल

आज २१/०६//२०१९ महाविद्यालयामध्ये जागतिक सूर्यनमस्कार दिवस साजरा केला . यानिमित्त महाविद्यालयामध्ये माननीय प्राचार्य डॉक्टर एस.एन.शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले होते . आमच्या महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक श्री. अनिल दड्डी यांच्या हस्ते भितीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले . त्यानंतर सामूहिक सूर्यनमस्कार घालण्याचा कार्यक्रम केला . याचे नेतृत्व श्री अनिल दड्डी सर यांनी केले . सूर्यनमस्कारचे प्रकार , किती वेळ एका स्तरावर थांबावे , कोणत्या स्तरावर कोणते मंत्र म्हणावे या सर्व सूचना श्री. अनिल गड्डी सर हे सांगत होते. रोज कमीत कमी 25 सूर्यनमस्कार घालावे आणि यामुळे होणारे फायदे श्री. दड्डी सर यांनी सांगितले .

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य , सर्व प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम आणि द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक या सामूहिक सूर्यनमस्कार कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते . जवळपास दोन तासाचा प्रात्यक्षिक व माहितीपर कार्यक्रम झाला . सर्व छात्र शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आले . कार्यक्रमाच्या शेवटी आमच्या महाविद्यालयाच्या छात्र शिक्षिका कु. राधिका वाडेकर यांनी सर्वांचे आभार मानले .



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya Gadhinglaj Dist.Kolhapur ESTD 1990

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती

२६/०६/२०१९

जागृती शिक्षण शास्त्र महाविद्यालयांमध्ये छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली . यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आदरणीय शाहू महाराजांच्या फोटोचे पूजन केले . छात्र शिक्षक श्री. दत्तात्रय फराकटे यांनी शाहू महाराजांच्या कार्याचा थोडक्यात आढावा आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये घेतले .

त्यानंतर श्री. राहुल कलाजे यांनी आदरणीय शाहू महाराजांच्या संपूर्ण जीवनाचा वृत्तांत सांगितला . माननीय प्राचार्यांनी आपल्या मनोगतामध्ये आदरणीय शाहू महाराजांना राजर्षी आणि लोकनेते ही उपाधी का दिली गेली याचा आढावा घेतला . सविस्तरपणे आपले विचार व्यक्त केले . कार्यक्रमाची सांगता छात्र शिक्षिका कु. शितल भाट यांनी आभार प्रदर्शनाने केली.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

०१/०८/२०१९ रोजी आमच्या महाविद्यालयांमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीचा कार्यक्रम झाला . यानिमित्य आयोजित कार्यक्रमाची सुरुवात या दोन नेत्यांच्या फोटो पूजनाने झाले. माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते फोटो पूजन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत श्री. मुकेश दुरगडे यांनी केले .

प्रास्ताविकानंतर छात्र शिक्षकांचे मनोगत झाले . यामध्ये कु. वेरोनिका बार्देस्कर यांनी लोकमान्य टिळकांचा जीवन परिचय करून दिला. कु. राखी भोसले यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच असे ठणकावून सांगणारे लोकमान्य टिळक इंग्रजांच्या विरुद्ध उभा केलेला लढा सांगितला. श्री. प्रवीण फाळके यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जीवन परिचय करून दिला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या लोकगीताने समाज जागृती कशी केली हे सांगितले.

महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक श्री. एस. बी. मगदूम यांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या एकूण कार्याचा आढावा आपल्या मनोगतामध्ये थोडक्यात व्यक्त केले. माननीय प्राचार्य आपले अध्यक्ष मनोगत व्यक्त केले. या दोन महान नेत्यांच्या जीवनाची सुरुवातच संघर्षातून झाली , त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा उभा करणे आणि समाजातील रूढी परंपरा मोडून काढणे हे त्यांना नवीन नव्हते. या दोन नेत्यांच्या जीवनामध्ये आलेल्या कठीण प्रसंगाचे वर्णन मोजक्या शब्दात केले . अध्यक्षीय मनोगतानंतर कु. पूजा चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## स्वातंत्र्य दिन - अहवाल

15 ऑगस्ट 2019 रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला . सकाळी ठीक ०७ वाजून 30 मिनिटांनी विद्या प्रसारक मंडळाचे संचालक श्री. किशोर हंजी साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला . या कार्यक्रमांमध्ये आमच्या संस्थेच्या जागृती बी.एड. कॉलेज, न्यू होरायझन सीबीएससी स्कूल आणि पार्वती हायस्कूल औरनाळ या तिन्ही शाखेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते .

या कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत व सत्कार आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी केले. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमासाठी तिन्ही शाखेचे शाखाप्रमुख सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. शेवटी कु. सुदर्शना चौगुले यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## शिक्षक दिन - अहवाल

दि. ०५/०९/२०१९ भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो . यानिमित्त आमच्या महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते . महाविद्यालयाच्या दैनंदिन कामाची जबाबदारी छात्र शिक्षकांनी आपल्यावर घेतली होती , त्यामुळे महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या प्रार्थने पासून दैनंदिन कार्याला सुरुवात झाली . वेळापत्रकातील पहिले चार तास छात्र शिक्षकांनी घेतले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले . छात्र शिक्षक श्री. प्रीतम गायकवाड यांच्या प्रास्ताविकेने कार्यक्रमाला सुरुवात झाली . प्रास्ताविके नंतर छात्र शिक्षक श्री. चेतन कणसे , कुमारी शितल गुलगुंजी , कुमारी सुषमा हसुरकर , कुमारी स्नेहा शेळके , श्री. मकरंद माने यांनी आपली मनोगते व्यक्त केली . यामध्ये डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा भारतीय शिक्षण व्यवस्थेमधील योगदान काय आहे हे सविस्तर मांडले . अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्यांनी समाजाच्या आणि देशाच्या जडनघडने मध्ये शिक्षकांचे योगदान काय आहे हे सविस्तर सांगितले . कार्यक्रमाच्या शेवटी कु. शिल्पा जाधव यांनी आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## शिक्षक दिन - अहवाल

आज दि. ०५/०९/२०२० भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. आज आमच्या महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व छात्र शिक्षक उपस्थित होते.

या प्रतिमा पूजनानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षक श्री. समीर बिरंबोळे यांनी केले. शिक्षक म्हणून यशस्वी होण्यासाठी काही आदर्श डोळ्यासमोर ठेवून चालणे गरजेचे आहे. त्यापैकीच एक आदर्श म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन होय, असे विचार आपल्या प्रास्ताविकामध्ये व्यक्त केले. त्यानंतर श्री. वैभव कागवाडे, श्री. दिग्विजय मेतकर, कु. माधुरी पाटील, कु. रोहिणी सावंत आधी छात्र शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये स्वतः शिक्षक होण्याचे का ठरविले आणि आत्तापर्यंतच्या आपल्या जीवनामध्ये आपले आई-वडील आणि शिक्षकांचे स्थान काय आहे हे व्यक्त केले.

छात्र अध्यापकांच्या मनोगतनंतर प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षक समाजामध्ये कशाप्रकारे परिवर्तन घडवून आणतो दआणि सध्याच्या काळाची आव्हाने पेलण्यासाठी सक्षम असा नागरिक घडू शकतो हे उदाहरणासह स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगता मध्ये माननीय प्राचार्यांनी आपला एकूण अनुभव सविस्तरपणे मांडले. अध्यक्षीय मनोगता नंतर छात्र शिक्षिका कु. मयुरी शिंत्रे यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

---

## साक्षरता दिन

आमच्या महाविद्यालयामध्ये दि. ०८/०९/२०१९ रोजी साक्षरता दिवस साजरा करण्यात आला . या दिनाच्या निमित्ताने भितीपत्रके तयार करण्यात आली होती . या भीती पत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. एस. एन. शिंदे यांनी फीत कापून केली . प्रत्येक गटासाठी एक स्वतंत्र विषय दिलेला होता . आपापल्या विषयांमध्ये अत्यंत आकर्षक अशी भित्तीपत्रके छात्र शिक्षकांनी तयार केले होते . छात्र शिक्षक कु. सरिता दळवी , श्री दत्तात्रेय फराकटे , कु. प्रीतम गायकवाड ,कु. माधुरी हसुरकर , कु. आकाशी जाधव , श्री. विशाल माने , श्री. सुशांत पाटील ,कु. प्रियंका सुतार , कु. शुभांगी तोडकर इत्यादी छात्र शिक्षकांनी आपला सहभाग नोंदविला होता .

या सर्व छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे आणि छत्र शिक्षकांचे कौतुक माननीय प्राचार्यांनी केले . छात्रशिक्षक श्री. शांताराम पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये सर्व भितीपत्रकाचा आढावा घेतला . या दिवशी महाविद्यालयांच्या काच फलकामध्ये लावलेल्या भितीपत्रकांचे प्रदर्शनच काही और दिसत होते . शेवटी आमच्या महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## हृदय विकार जागृतता दिन - अहवाल

२४/०९/२०१९ हा दिवस हृदय विकार जागृतता दिवस म्हणून साजरा केला जातो . या दिवशी आमच्या महाविद्यालयामध्ये हृदय विकार - धोके आणि उपाय या विषयावर भित्तीपत्रके तयार करण्यात आली होती . विशेषता विज्ञान विभागातील छात्र शिक्षकांनी हृदय रोगाविषयी वैज्ञानिक दृष्टिकोनातून काही तज्ञ आणि विचारवंतांचे चित्रयुक्त माहिती प्रस्तुत केली होती . यामध्ये प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांचा सहभाग दिसून आला .

विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. कु.एस.एस.जाधव यांनी या विषयावर प्राथमिक स्वरूपाची माहिती सांगितली . त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते भित्तिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले . शेवटी कु. अश्विनी कांबळे या छात्र शिक्षिकेने सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## रक्तदान दिन - अहवाल

०१/१०/२०१९ रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये रक्तदान दिन हा कार्यक्रम आयोजित केला होता . या निमित्ताने महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी भित्ती पत्रके तयार केली होती . या भितीपत्रकाचे उद्घाटन आमच्या संस्थेचे संचालक डॉ. शिवकुमार कोल्हापुरे यांच्या हस्ते करण्यात आले . त्यांनी आपल्या मनोगतामध्ये आपले एकट्याचे रक्तदान म्हणजे पाच जीवांचे जीवनदान आहे , यासाठी सुदृढ आणि आरोग्य संपन्न लोकांनी दरवर्षी किमान एकदा तरी रक्तदान करावे , असे आवाहन केले.

प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या रक्तदान कार्यक्रमांमध्ये आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविला . या दिवशी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये विद्यार्थी , पालक , ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . यावेळी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे सर्व रक्तदात्यांचे मनापासून ऋण व्यक्त केले . यापुढे सुद्धा अशाच प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली . शेवटी आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांनी उपस्थित सर्व वैद्यकीय अधिकारी व स्टाफ या सर्वांचे आभार मानले. तसेच सर्व रक्तदाते , आमच्या महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाचे सर्व छात्र शिक्षक , पालक वर्ग , महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे आभार मानले व कार्यक्रम संपला असेल जाहीर केले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती - अहवाल

०२/१०/२०१९ रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये म.गांधीजी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती साजरी केली. यानिमित्त भित्तीपत्रके तयार करण्यात आली होती. या भित्तीपत्रकांचे उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. एस.एन.शिंदे यांनी केले. महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक उस्फुर्तपणे भित्तिपत्रके तयार केली होती . संपूर्ण वर्गामध्ये त्यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते . या भित्ती पत्रकामध्ये विभिन्नता दिसून येत होती . प्रत्येक जण आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केला होता . या प्रदर्शनानंतर दुपारी एक छोटे खानी कार्यक्रम आयोजित केला होता .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र त्र शिक्षिका कु. तनुजा हरेर यांनी केले . यानंतर काही छात्र शिक्षकांची मनोगते झाली. अध्यक्षीय मनोगतामध्ये माननीय प्राचार्यांनी महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान , सत्य , अहिंसा आणि सत्याग्रह या गोष्टींचा मूलमंत्र महात्मा गांधीजींनी कसा वापरला हे सांगितले . स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान आदरणीय लहान बहादूर शास्त्रीजी आपल्या छोट्याशा कालावधीमध्ये सुद्धा देश उभारणीमध्ये स्वतःचे आदर्श कसे निर्माण केले हे सांगितले . अध्यक्षीय मनोगतनंतर छात्र शिक्षिका कु. वंदना कांबळे यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# आंतरराष्ट्रीय एड्स दिन - अहवाल

आज दि. ०१/१२/२०१९ आमच्या महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय एड्स निर्मूलन दिन साजरा करण्यात आला . या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी "एड्स जागृती आणि वास्तव" या विषयावर वेगवेगळी भित्तिपत्रके तयार केले होते. महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाने या भितीपत्रकाचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते भित्तिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी छात्रशिक्षिका कु. भाग्यश्री लोहार यांनी एड्स जागृतीचे महत्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, त्याला सामाजिक बांधिलकी या सर्व गोष्टींचे सविस्तर मांडणी केली. यानंतर माननीय प्राचार्य यांनी सुद्धा प्रत्येकाचे कौटुंबिक जीवन सुखाचे आणि समाधानाचे होण्यासाठी एड्स जागृती करणे आणि कुटुंब संस्था आबादीत ठेवणे गरजेचे आहे हे सांगितले . शेवटी कु. सुप्रिया पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj


जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

आज दि. ०३/०१/२०२० रोजी सावित्रीबाई फुले जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटो पूजनाने झाले. वसंतराव नाईक बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातील छात्र शिक्षिका कु. विद्या पाटील यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला मुक्ती दिन म्हणून साजरी केली जाते. या पाठीमागे महिलांच्या असणाऱ्या भावना स्पष्ट केल्या.

यानंतर कु. लता माने यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून सुद्धा साजरी केली जाते हे सांगितले. आज भारतामध्ये जन्माला येणारी बालिका तिला मिळणारे संरक्षण, स्वातंत्र्य, शिक्षण आणि सामाजिक स्वातंत्र्य हे फक्त सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच मिळते, याची सविस्तर चर्चा केली. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व महिला भगिनींना शुभेच्छा दिल्या. शेवटी कु. सुनीता शिंपुगडे यांनी आभार मानले. अशा प्रकारे हा कार्यक्रम संपन्न झाला.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj.





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती

दि. १२/०१/२०२० रोजी आमच्या महाविद्यालयांमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक आणि प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षक दत्तात्रय फराकटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकेमध्ये युवकांचे प्रेरणास्थान आणि कोणतेही काम झपाटून केले पाहिजे यासाठी आपण नेहमीच पुढाकार घेतले पाहिजे असे म्हणणारे स्वामी विवेकानंद तरुणांचे मार्गदर्शन कसे केले हे सविस्तर सांगितले. राजमाता महाराणी जिजाऊ यांचे शिवाजीराजे यांच्या जीवनातील स्थान सांगितले. त्यानंतर छात्र शिक्षक कु. आश्विनी कांबळे कु. माधुरी कुदळे श्री. विशाल माने यांची मनोगते झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये स्वामी विवेकानंदांचे शैक्षणिक विचार आणि राजमाता जिजाऊ आद्य शिक्षिका म्हणून शिवाजीराजांना शिकविलेले धडे यांची चर्चा केली. शेवटी छात्र शिक्षक श्री. सुशांत पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. अशा पद्धतीने हा कार्यक्रम संपन्न झाला.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## जागतिक सूर्यनमस्कार दिन

आज दि. २८/०१/२०२० आमच्या महाविद्यालयामध्ये जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला . जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांनी सूर्यनमस्काराचे फायदे आणि प्रकार प्रत्येक प्रकाराची स्थिती दर्शविणारी आकर्षक अशी भितीपत्रक तयार केले होते . ही भीती पत्रके महाविद्यालयाच्या काच फलकांमध्ये लावण्यात आले होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते या भितीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले.

भित्तिपत्रक तयार करणारे छात्र शिक्षक श्री. मकरंद माने यांनी सूर्यनमस्कार केव्हा व किती घालावे, त्याचे फायदे काय आहेत, आज त्याची काय गरज आहे ही सर्व माहिती आवश्यक उदाहरणे आणि दाखल्यासह सविस्तर सांगितले. त्यानंतर आमच्या महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक श्री. अनिल दड्डी सर यांनी सूर्यनमस्कार घालत असताना घ्यावयाची काळजी सविस्तर सांगितले . छात्र शिक्षकांच्या बरोबरच छात्र शिक्षिकांना सुद्धा विशेषता महिला वर्गांसाठी सूर्यनमस्काराचे फायदे काय आहेत हे छात्र शिक्षिका कु.सुनीता शिंपूकडे यांनी सविस्तर सांगितले. छात्र शिक्षकांच्या मनोगता नंतर माननीय प्राचार्य यांचे मनोगत झाले. शेवटी छात्र शिक्षिका कु. लताताई वांजोळे यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## काव्यवाचन अहवाल

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे दिनांक 17 फेब्रुवारी 2020 रोजी "रंग कवींचा गंध संस्कृतीचा " या विषयांतर्गत काव्य वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .सदर काव्यवाचन स्पर्धेमध्ये बीएड प्रथम व द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी सहभाग नोंदविला .निसर्ग विषयक कविता , विनोदी कविता ,सद्यस्थिती वर आधारित कविता , प्रेम कविता , सामाजीक समस्येवर आधारीत कविता त्याचबरोबर शिक्षण विषयक कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस एन शिंदे सर होते अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य यांनी काव्य वाचनाचे महत्त्व पटवून दिले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक ए एम नवले यांनी तर आभार प्रदर्शन प्राध्यापक आर बी पाटील यांनी केले .




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती

आज दि. १९/०२/२०२० रोजी महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचा कार्यक्रम साजरा झाला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या भाव पूर्ण सोहळ्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी आणि छात्र शिक्षक उपस्थित होते. प्रतिमा पूजनानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने महाविद्यालयातील वातावरण प्रसन्न झाले होते. सर्वांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. यानंतर छात्र शिक्षकांची मनोगते झाली.

सुरुवातीला छात्र शिक्षिका कु. राखी भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या तयारीमध्ये छात्र शिक्षकांच्या उत्साहाचे तोंड भरून कौतुक केले. प्रत्येक छात्र शिक्षक मनापासून सहभाग दर्शवित होता. यानंतर छात्र शिक्षक श्री. प्रवीण फाळके यांनी छत्रपती शिवाजी राजेंची कार्यनीती आज काळाची गरज कशी आहे हे ऐतिहासिक दाखले देऊन स्पष्ट केले.

यानंतर कु. शिल्पा जाधव या छात्र शिक्षिकेने लहानपणी इतिहासाच्या पुस्तकात वाचलेले छ. शिवाजी महाराज आणि आत्ता स्वतःहून समजलेले छ. शिवाजी महाराज यांच्यातला फरक अत्यंत मोजक्या आणि नेमक्या शब्दांमध्ये व्यक्त केल्या. यानंतर कु. रोहिणी कुरळे, नेहा पाटील, शुभांगी सावंत यांनी आपली मनोगते व्यक्त केली. माननीय प्राचार्य आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले आणि शेवटी कु. प्रियंका सुतार या छात्र शिक्षिकेने सर्वांचे अंतःकरण पूर्वक आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya, Gadhinglaj Dist.Kolhapur ESTD 1990

# मराठी राजभाषा दिन - अहवाल

**मराठी राजभाषा दिन** अर्थात मराठीचे श्रेष्ठ तथा ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज म्हणजेच वी.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन होय. आपल्या महाराष्ट्रामध्ये हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आमच्या महाविद्यालयाच्या वतीने सिंबायोसिस स्कूल हरली येथे आज दि. २७/०२/२०२० कार्यक्रम आयोजित केला होता. सुरुवातीला भित्तीपत्रकाचे उद्घाटन माननीय मुख्याध्यापक श्री गुरव सर यांच्या हस्ते करण्यात आले. श्री मुरगी सर, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यावेळी महाविद्यालयातील मराठी विषयाचे विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. ए. एम. नवले आणि मराठी विभागाचे छात्र शिक्षक उपस्थित होते.

महाराष्ट्राची मातृभाषा मराठी, या भाषेची व्याकरणीक गुणवैशिष्ट्ये, मराठी विषयाचे संपन्न साहित्य, संत कवी, श्रेष्ठ साहित्यिक तसेच मराठी विषयाच्या प्रसार आणि प्रचारासाठी आपले जीवन वेचणारे श्रेष्ठ तथा ज्येष्ठ साहित्यकार, त्यांच्या काही निवडक कविता, अशा वेगवेगळ्या विषयांवर सुंदर आणि आकर्षक भित्तिपत्रके तयार करण्यात आली होती. या भित्तीपत्रकाचे उद्घाटनानंतर मराठी विषयाचे छात्र शिक्षक श्री. नवाज शरीफ बागवान यांनी सर्व प्रशिक्षकांचे, प्राध्यापकांचे आणि प्राचार्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी प्रेरणा देणारे मराठीचे प्राध्यापक श्री. ए. एम. नवले सर यांचे विशेष आभार मानले गेले. अशाप्रकारे हा कार्यक्रम संपन्न झाला.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राष्ट्रीय विज्ञान दिन - अहवाल

आज दि. २८/०२/२०२० राष्ट्रीय विज्ञान दिन यानिमित्त आमच्या महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाची सुरुवात भितीपत्रकाच्या उद्घाटनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि छात्र शिक्षक उपस्थित होते.

तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रक आजच्या काळात विज्ञान विषयाचे महत्त्व, विज्ञानामध्ये केलेले नवनवीन प्रयोग आणि त्यातून साध्य केलेले निष्कर्ष या विषयांवर भित्तीपत्रके तयार केली होती. तसेच वेगवेगळ्या वैज्ञानिकांचे जीवनपट दर्शविणारे तक्ते तयार केली होती नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये विज्ञान विषयासाठी दिलेले किंवा दर्शविलेले स्थान काय आहे याचाही आढावा या भितीपत्रकामध्ये घेतला होता. क्या भित्तिपत्रकामध्ये सर्वच छात्र शिक्षकांचा सहभाग दिसून आला दिसून आला. विज्ञान विषयाचे मार्गदर्शन प्राध्यापीका एस एस जाधव मॅडम यांनी केले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj.

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya Dist. Kolhapur ESTD 1990 Gadhinglaj

## शिवराज्याभिषेक दिन सोहळा - अहवाल

आमच्या महाविद्यालयातील इतिहास अध्यापन पद्धतीच्या छात्र शिक्षकांनी शिवराज्याभिषेक दिन सोहळा या ०२/०६/२०१८ या दिवशी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवात मा. प्राचार्य डॉ. एस एन शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. मधुकर देसाई या छात्र शिक्षकाने केले. श्री. मायाप्पा धनगर या छात्र शिक्षकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक कार्यक्रमाचे वर्णन केले. राज्याभिषेक करण्यामागचा हेतू सांगितला. तसेच छत्रपतींची दूरदृष्टी सुद्धा उदाहरणासह स्पष्ट केली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एस एन शिंदे यांनी शिवराज्याभिषेकासाठी रायगड किल्ल्याचीच निवड का केली, हे आपल्या मनोगतामध्ये सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी कु. अमृता कुलकर्णी या छात्र शिक्षिकेने सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक उपस्थित होते.

PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती -अहवाल

आज दि. २६/०६/२०१८ रोजी आमच्या महाविद्यालयांमध्ये राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजर्षी शाहू महाराज यांच्या फोटोचे पूजन मा. प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांच्या हस्ते केले.

त्यानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक छात्र शिक्षक किशोर पाटील यांनी केले. छत्र शिक्षकांच्या मनोगतामध्ये सुरुवातीला श्री वैभव पाटील यांनी शाहू महाराजांची जीवन वृत्तांत सांगितले त्यानंतर दुसऱ्या छात्र शिक्षकांनी श्री जयंत देसाई यांनी राजश्री शाहू महाराज यांनी सामाजिक सलोखा राखण्यासाठी संस्कृती धार्मिक आर्थिक आणि शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पोषक असे धोरण कसे राबवले ते सांगितले.

करवीर संस्थानिकांमध्ये एक आदर्श समाज व्यवस्था कशी निर्माण केली हे उदाहरणासह सविस्तर सांगितले अध्यक्ष मनोगतामध्ये मा. प्राचार्य डॉ. शिंदे यांनी छत्रपती शाहू महाराज यांना राजर्षी व लोकनेते असे का म्हणतात ते सविस्तर सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी छात्र शिक्षिका कु. प्रिया पेडणेकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व छात्र शिक्षक उपस्थित होते.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalay
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज मध्ये ०१ ऑगस्ट २०१८ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. या दोन नेत्यांच्या प्रतिमेचे पूजन मा. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवातच या प्रकारे झाली. कु. अश्विनी देसाई या छात्रशिक्षिकेने उपस्थित सर्वांचे स्वागत आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. छात्र शिक्षकांच्या मनोगतामध्ये कु. मनस्वी देसाई यांनी लोकमान्य टिळकांचा जीवन परिचय करून दिला स्वातंत्र्यासाठी केलेला संघर्ष शब्द रूपात व्यक्त केले. त्यानंतर कु. अपर्णा वेटे या छात्र शिक्षिकेने लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान दाखल्यासह सविस्तर मांडले.

श्री. अंकुश सावंत या छात्र शिक्षकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा परिचय करून दिला. यामध्ये अण्णाभाऊ साठे यांना लोकशाहीर असे का संबोधले जाते हे स्पष्ट केले. समाज जागृतीसाठी अण्णाभाऊंच्या कार्याची ओळख करून दिली. मा.प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी या दोन्ही नेत्यांच्या कार्याचा आढावा आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता श्री. सागर शिंगटे या छात्र शिक्षकांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. कॉलेजमधील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व छात्र शिक्षक यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Jagruti Shikshanshastra Mahavidyalaya
Dist. Kolhapur
ESTD 1990
Gadhinglaj

## स्वातंत्र्य दिन - अहवाल

विद्या प्रसारक मंडळ गडहिंग्लज संचलित जागृती शिक्षण शास्त्र महाविद्यालय, न्यू होरायझन सी बी एस सी स्कूल व पार्वती हायस्कूल औरनाळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम १५/०८/२०१८ रोजी संपन्न झाला. या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या ध्वजारोहणासाठी संस्थेचे सचिव मा. श्री.ॲड. बी. जी. भोसकी साहेब उपस्थित होते. सुरुवातीला या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्रा. श्री.एस. बी. मगदूम यांनी केले.

त्यानंतर प्रमुख उपस्थित संस्थेच्या सचिवांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने तिन्ही शाखेतील प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते  करण्यात आला . यावेळी तिन्ही शाखेचे शाखाप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, बी.एड.चे छात्र शिक्षक, इतर शाखेचे सर्व विद्यार्थी, पंचक्रोशीतील नागरिक व मान्यवर उपस्थित होते. या सर्वांचे आभार प्रा. श्री. ए. एम. नवले यांनी मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## शिक्षक दिन - अहवाल

०५/०९/२०१८

भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांचा जन्मदिवस हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो . या शिक्षक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची सुरुवात आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे उद्घाटनाने झाली . वेग वेगळ्या विषयांवर तयार केलेले सर्व समावेशक अशी आकर्षक भीतीपत्रके होती . त्यानंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थित सर्वांचे स्वागत प्रा. श्री. आर. बी. पाटील यांनी केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या छात्र शिक्षकांची मनोगते झाली. कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख वक्त्यांनी समाजाच्या आणि देशाच्या जडणघडणीमध्ये शिक्षकाची भूमिका किती महत्त्वाची आहे हे वेगवेगळी उदाहरणे व दाखले देऊन स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या जीवनातील शिक्षकाचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे महाभारत व रामायणातील काही उदाहरणे देऊन स्पष्ट केले. देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थैर्यासाठी शिक्षकाशिवाय पर्याय नाही हे ठासून सांगितले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षक श्री. अक्षय तेलवेकर यांनी सर्व उपस्थित त्यांचे आभार मानले. अशा प्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj


जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## साक्षरता दिन- अहवाल

०८/०९/२०१८

साक्षरता दिनानिमित्त आमच्या महाविद्यालयातील छात्र शिक्षक वेगवेगळी भित्तिपत्रके तयार केली होती . या भितीपत्रकाचे उद्घाटन आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ज्या छात्र शिक्षकांनी भित्तिपत्रक तयार केले होते , त्यांनी आपापल्या भितीपत्रकाचे वैशिष्ट्य आणि महत्त्व सांगितले. देशातील व जगातील साक्षरतेचे प्रमाण तुलनात्मक दृष्टीने सर्वांसमोर मांडले. मानवाच्या, समाजाच्या आणि देशाच्या विकासासाठी शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे दर्शविणारे भितीपत्र होते .

भित्तिपत्रकाच्या उद्घाटनानंतर माननीय प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वतःपुरते मर्यादित न राहता कुटुंबासाठी, समाजासाठी, गावासाठी व राष्ट्रासाठी शिक्षण आणि साक्षरता यांचे महत्त्व काय आहे हे सविस्तर सांगितले . शेवटी उपस्थित सर्वांचे आभार छात्र शिक्षिका कु. बसंती पाटील यांनी मांनले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# हिंदी दिन - अहवाल

आज आपल्या महाविद्यालयामध्ये १४/०९/२०१८ रोजी हिंदी दिन साजरा केला गेला. यानिमित्य हिंदी विभागाच्या छात्र शिक्षकांनी भित्तिपत्रिके तयार केली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आजचे प्रमुख पाहुणे प्रा. श्री. शिवाजीराव भुकेले यांच्या हस्ते भितीपत्रकाचे उद्घाटन झाले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित सर्वांचे स्वागत आणि प्रास्ताविक प्रा. एस. बी. मगदूम यांनी केली. या प्रास्ताविका नंतर काही छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यानंतर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. श्री. शिवाजीराव भुकेले सर यांनी हिंदी भाषेचे महत्त्व व राष्ट्रभाषा म्हणून त्याचे स्थान काय आहे हे सांगितले. आज राष्ट्राच्या विकासासाठी एका भाषेची गरज आहे आणि राष्ट्राची ही गरज हिंदी भाषा कशी पूर्ण करू शकते, हे आपल्या मनोगता मध्ये त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. राष्ट्र उभारणीमध्ये त्या राष्ट्राची भाषा किती महत्त्वाची आहे हे वेगवेगळ्या देशांची उदाहरणे देऊन स्पष्ट केले. त्यामुळे एका शक्तिशाली राष्ट्राच्या उभारणीसाठी एका भाषेची गरज आहे आणि ती राष्ट्रभाषा म्हणून हिंदी कशी पूर्ण करू शकते हे सांगितले . कार्यक्रमाच्या शेवटी छात्र शिक्षिका कु. नेहा जगदाळे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.


PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२


# हृदयविकार जागृतता दिन- अहवाल

आज दि. २४/०९/२०१८ रोजी **जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,** मध्ये हृदयविकार जागृतता दिन साजरा केला. या दिनाच्या निमित्ताने हृदय विकार - वाढते प्रमाण व घ्यावयाची काळजी हा विषय समोर ठेवला होता . या विषयावर छात्र शिक्षकांनी अनेक आकर्षक भितीपत्रके तयार केले होते. या भीती पत्रकाचे प्रदर्शन विज्ञान विभागाच्या वतीने मांडले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा. प्राचार्य डॉ.एस. एन. शिंदे यांच्या हस्ते भितीपत्रकांचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर विज्ञान विभागाची छात्र शिक्षिका कु. मनस्वी देसाई हिने सर्वांचे स्वागत केले. हृदय रोग, घ्यावयाची काळजी व उपाय यावर तयार केलेल्या प्रत्येक पोस्टरची सविस्तर माहिती सांगितली.

प्राचार्य डॉ एस एन शिंदे यांनी सुद्धा आजचे गतिमान जग, आपले राहणीमान आणि आरोग्या विषयी घ्यावयाची काळजी, यावर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रथम व द्वितीय वर्षाचे सर्व छात्र शिक्षक उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी कु. सायली सरदेसाई या छात्र शिक्षिकेने सर्वांचे आभार मानले.





PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# रक्तदान दिन - अहवाल

आज ०१/१०/२०१८ रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये रक्तदान दिन साजरा करण्यात आला. रक्तदान - गरज व महत्त्व या विषयावर भितीपत्रके तयार केले होते. प्रथम व द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी भितीपत्रकाचे प्रदर्शन मांडले होते. या भितीपत्रकाचे उद्घाटन आमच्या संस्थेचे संचालक ॲड. श्री. विकासराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये सुदृढ व्यक्तीने रक्तदान करणे का गरजेचे आहे. त्याचे महत्त्व उदाहरणासह पटवून सांगितले .

यानिमित्त आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एम शिंदे यांनी सर्व छात्र शिक्षकांचे कौतुक केले. त्यांना रक्तदानासाठी प्रवृत्त केले. सामाजिकता जबाबदारी म्हणून आपण हे कार्य केले पाहिजे आणि इथून पुढे सुद्धा करत राहिले पाहिजे असे आवाहन छात्र शिक्षकांना केले. शेवटी छात्र शिक्षिका कु. पायल आडोळे यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# म. गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंती - अहवाल

आज दि ०२/१०/२०१८ रोजी महाविद्यालयामध्ये महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला. यानिमित्ताने महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करून घेतला. परिसर स्वच्छता अभियान या उपक्रमामध्ये प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम आणि द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक सहभागी झाले होते. स्वच्छता अभियानानंतर छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. एस. एन.शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षिका कु. करुणा कांबळे यांनी केले. महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांमध्ये दिसणारी दूरदृष्टी, समाज रचनेच्या मूळ गाभाभूत घटकांना धरून असणारे त्यांचे शैक्षणिक विचार, तसेच स्वतःबरोबरच समाजाचा व देशाचा विचार शिक्षण व्यवस्थेमध्ये केला होता. अशा वेगवेगळ्या विषयांवर छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केले. स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींनी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नंतर अचानक पणे आपल्यावर पडलेली जबाबदारी किती प्रामाणिकपणे व चोखपणे बजावले हे वेगवेगळ्या प्रसंगांच्या आधारे प्रस्तुत केले गेले.

जय जवान जय किसान हे घोषवाक्य काळाची गरज होती, हे त्यांच्या दूरदृष्टीचे आदर्श रूप आहे. एक खंबीर नेता आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व त्याकाळी भारताला लालबहादूर शास्त्रीजींच्या रुपाने लाभलेले होते. असे छात्र शिक्षकांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त

केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री माझी प्राचार्य श्री. के. एस. पुजारी यांनी आपले अनमोल असेल विचार व्यक्त केले. महात्मा गांधीजींचा संपूर्ण इतिहास आपल्या ओघवत्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांच्या समोर मांडले. महात्मा गांधीजींचे विचार फक्त वाचून व ऐकून न घेता ते समजून घेतले पाहिजे आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तरच आपल्याला खऱ्या अर्थाने गांधीजी समजतील असे छात्र शिक्षकांना सांगितले. अध्यक्षीय मनोगतामध्ये मा. प्राचार्य एस. एन. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षिका कु नीलम भंडारी यांनी सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रम संपला असे जाहीर केले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

## जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
## ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# आंतरराष्ट्रीय एड्स निर्मूलन दिन - अहवाल

एड्स निर्मूलन दिनाच्या निमित्ताने ०१/१२/२०१८ रोजी महाविद्यालयांमध्ये भित्तीपत्रकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या छात्र शिक्षकांनी ही भित्तीपत्रक तयार केली होती. या भितीपत्रकाचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते केले. एड्स विषयी समाजामध्ये जाणीव जागृती करणे, त्याचे वाढते प्रमाण व धोके, प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी अशा अनेक विषयांवर ही भित्तीपत्रके तयार करण्यात आली होती.

यासाठी महाविद्यालयाच्या विज्ञान विभाग प्रमुख प्रा. संगीता जाधव मॅडम यांनी छात्रशिक्षकांना मार्गदर्शन केले होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली ही सर्व भित्तीपत्रक छात्र शिक्षकांच्या कडून तयार करून घेतल्या होत्या. या विषयावर भित्तीपत्रक तयार करणे आणि जाणिव जागृती करणे हा हेतू साध्य करावयाचा होता, असे त्यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षिका कु. अक्षता कुन्नुरी यांनी आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# सावित्रीबाई फुले जयंती - अहवाल

महाविद्यालयामध्ये ०३/०१/२०१९ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली. यानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन मा. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले . या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रथम व द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक उपस्थित होते. आदरणीय सावित्रीबाई फुले यांचा जीवन परिचय चित्ररूपाने प्रस्तुत केलेल्या एका भितीपत्रकाचे अनावर केले गेले.

याप्रसंगी छात्रशिक्षिका कु. लक्ष्मी मोकाशी यांनी आदरणीय सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन हा महिला मुक्ती दिन व बालिका दिन म्हणून का साजरा केला जातो ते सांगितले. महिलांना रूढी परंपरेच्या बंधनातून मुक्त करण्याचे काम या सावित्रीबाई फुलेंनी केले. आपल्या कौटुंबिक जीवनाचा विचार न करता पीडित स्त्रियांसाठी काम करणाऱ्या सावित्रीबाई फुलेंना विनम्र अभिवादन केले. माननीय प्राचार्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी छात्र शिक्षिका कु. कल्याणी मोरे यांनी आभार मानले.




PRINCIPAL
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती -

आज १२/०१/२०१९ रोजी महाविद्यालयांमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. माननीय प्राचार्य डॉक्टर एस. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले.

यावेळी प्रथम वर्षाचे सर्व छात्र शिक्षक हजर होते. या छात्र शिक्षकांना माननीय प्राचार्यांनी मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीमध्ये राजमाता जिजाऊ यांच्या योगदानाचे वर्णन केले . एक आई म्हणून आणि एक राजमाता म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व सांगितले. तसेच स्वामी विवेकानंदांचे विचार तरुणांसाठी किती महत्त्वाच्या आहेत ते सांगितले. भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये त्यांचे योगदान आणि शैक्षणिक विचाराला अध्यात्माची जोड देऊन तरुणांना केलेले मार्गदर्शन याची सविस्तर माहिती सांगितली. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता छात्र शिक्षक श्री. अमोल मोकाशी यांनी आभार प्रदर्शनाने केली.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

Shikshanshastra Mahavidyalaya, Gadhinglaj Dist.Kolhapur ESTD 1990

## प्रजासत्ताक दिन - अहवाल

आज २६/०१/२०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. विद्या प्रसारक मंडळ गडहिंग्लज संचलित जागृती बी.एड. कॉलेज , न्यू होरायझन सीबीएसई स्कूल आणि पार्वती हायस्कूल औरनाळ यांचा कार्यक्रम झाला या संयुक्त कार्यक्रमा साठी संस्थेचे जेष्ठ संचालक माननीय डॉक्टर शिवकुमार कोल्हापुरे साहेब हे उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला . त्यानंतर राष्ट्रगीत , ध्वजगीत व देशभक्तीपर समूहगीत सादर करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये आमच्या महाविद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षाचे सर्व छात्र शिक्षक सहभागी होते . संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन आमच्या छात्र शिक्षकांनी केले होते . याप्रसंगी तिन्ही शाखेचे शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला या सर्व मान्यवरांचे स्वागत माननीय प्राचार्य डॉक्टर एस. एन. शिंदे यांनी केले . कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापक श्री. आर. बी. पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती - अहवाल

आज १९/०२/२०१९ रोजी महाविद्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी राजांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले. प्रतिमापूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले . प्रतिमा पूजनामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रथम आणि द्वितीय वर्षाचे छात्र शिक्षक सहभागी झाले होते.

प्रतिमा पूजनानंतर छात्र शिक्षकांच्या प्रत्येक गटाने स्वतःचे एक भित्तीपत्रक तयार केले होते. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनपट मांडण्याचा प्रयत्न केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, त्यांचे शिक्षण, त्यांचे शौर्य, त्यांच्या लढाया, त्यांच्या जीवनातले महत्त्वाचे प्रसंग, त्यांचा राज्याभिषेक सोहळा, त्यांचे अष्टप्रधान मंडळ, त्यांनी जिंकलेले किल्ले, त्यांचा गनिमी कावा अशा वेगवेगळ्या विषयांवर भित्तीपत्रके तयार केले होते. यावेळी प्रत्येक गटाने तयार केलेल्या आपल्या भितीपत्रकाविषयी माहिती सादर केली . माननीय प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सहभागी सर्व छात्र शिक्षकांचे कौतुक केले आणि या थोर महात्म्याची वीर गाथा थोडक्यात मांडले. कार्यक्रमाची सांगता छात्र शिक्षिका कु. सविता नरेवाडी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून केले.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# मराठी राजभाषा दिन- अहवाल

मराठी भाषेचे जेष्ठ आणि श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस हा मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. २७/०२/२०१९ या दिवशी महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या छात्र शिक्षकांनी भितीपत्रके तयार केले होती . यामध्ये मराठी भाषे बरोबरच कवी कुसुमाग्रजांचा जीवन पट मांडला होता . कार्यक्रमाच्या सुरुवातीला माननीय प्राचार्य डॉक्टर एस. एन. शिंदे यांच्या हस्ते भित्ती पत्रकांचे उद्घाटन केले.

सर्व भित्तीपत्रके खूपच सुंदर व आकर्षक होती. यानंतर मराठी विभागाचे प्राध्यापक श्री. ए. एम. नवले यांनी प्रास्ताविक व मराठी भाषेचे महत्व आणि विकास सविस्तर पणे सांगितले. त्यानंतर मराठी विषयाचे छात्र शिक्षक श्री. मधुकर देसाई, श्री. मकरंद कुलकर्णी, कुमारी स्नेहल माने यांनी आपले मनोगत व्यक्त केले . अध्यक्षीय मनोगतामध्ये माननीय प्राचार्यांनी मराठी भाषेच्या विकासामध्ये संतांचे योगदान सांगितले . शेवटी छात्र शिक्षिका कुमारी रिया कारवालो यांनी आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj


जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

# राष्ट्रीय विज्ञान दिन - अहवाल

आज २८/०२/२०१९ रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला. महाविद्यालयातील विज्ञान विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला विज्ञान विभागातील छात्र शिक्षकांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे उद्घाटन झाले. छात्र शिक्षक श्री. बाबासाहेब जिनराळे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर विज्ञान विषयाचे विभागप्रमुख प्राध्यापिका एस. एस. जाधव मॅडम यांनी प्रास्ताविक केले. भीतीपत्रकामध्ये नाविन्य व वेगळेपण दिसून आल्याचे आपल्या मनोगतामध्ये माननीय प्राचार्य डॉक्टर एस. एन. शिंदे यांनी सांगितले.

राष्ट्रीय विकासामध्ये विज्ञान विषयाचे महत्त्व सविस्तर विशद केले . विद्यार्थी जीवनामध्येच या विषयाचे महत्त्व ओळखले पाहिजे आणि त्याप्रमाणे विद्यार्थ्यांचे जडणघडण केले पाहिजे हेही सांगितले. शेवटी छात्र शिक्षिका कु. जॉयलिन डिसोझा यांनी सर्वांचे आभार मानले.




PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj

# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## जागतिक महिला दिन- अहवाल

०८/०३/२०१९

आज आमच्या महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महिला सन्मान कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील सर्व मुलांनी केला होता. ऐतिहासिक तसेच आधुनिक काळातील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नावाजलेल्या निवडक महिलांचा जीवन परिचय देणारी वेशभूषा करण्यात आली होती .

या कार्यक्रमाची सुरुवात केक कापून केली. प्रास्ताविक छात्र शिक्षक श्री. शुभम बागडी यांनी केले. यानंतर आमच्या महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका आणि मुलींचा पुष्पगुच्छ देऊन मा.प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. यानंतर काही छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. अध्यक्षीय मनोगतामध्ये माननीय प्राचार्यांनी स्त्रीची वेगवेगळी रूपे सांगितले , जसे की मुलगी , बहीण , पत्नी , आई आणि आजी या वेगवेगळ्या रूपामध्ये स्त्रीची भूमिका काय असते आणि कशी बदलते . या सर्व भूमिका स्त्री किती प्रामाणिकपणे निभावत असते . याची जाणीव करून दिली. प्राध्यापिका संगीता जाधव मॅडम यांनी केलेला सत्कार आणि सन्माना बद्दल ऋण व्यक्त केल्या . शेवटी छात्र शिक्षक श्री.किशोर पाटील यांनी सर्वांचे आभार मानले .



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj


# जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय गडहिंग्लज,
# ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर ४०६ ५०२

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती- अहवाल

१४/०४/२०१९

आज आमच्या महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने भित्तीपत्रके तयार करण्यात आली होती . कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांच्या हस्ते भितीपत्रकांचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्र शिक्षिका कु. पुजा कोकितकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रा. डॉ. शशीकांत संघराज यांचे स्वागत आणि परीचय छात्र शिक्षक श्री. वैभव पाटील यांनी केले.

सुरुवातीला काही छात्र शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. प्रमुख वक्ते श्री. संघराज सरांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची भारतीय शिक्षण व्यवस्थेविषयी असणारी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी स्वतःच्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट, सोसलेल्या यातनां याचं सचित्र वर्णन आपल्या ओघवत्या भाषेमध्ये केले. उद्याच्या युवकांकडून असणा-या अपेक्षा सांगितले. समाज व्यवस्था आणि देशापुढील आव्हानांची जाणिव करुन दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिवनातील प्रत्येक घटनेची माहिती दिली. स्वतंत्र भारताच्या संविधान निर्मितीसाठी केलेले प्रयत्न सांगितले. अत्यंत अभ्यासपूर्ण असं व्याख्यान झाले. या नंतर मा. प्राचार्यांचे अध्यक्षीय मनोगत झाले. शेवटी छात्र शिक्षिका कु. हाजरा तकिलदार यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



PRINCIPAL
Jagruti Shikshan Shastra Mahavidyalaya
Gadhinglaj